CNR No. MHRG040006842025

<u>विवाह अर्ज क्र.११९/२०२५ मधील निशाणी क्र.८ वरील आदेश</u>

प्रस्तुत अर्ज संमतीने घटस्फोट घेण्याकरीता हिंदू विवाह कायदा कलम १३-ब(२) नुसार नमुद असलेला सहा महिन्यांचा कालावधी माफ करून मिळण्याकरीता दाखल करण्यात आलेला आहे.

२. अर्जाचे व दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदारांचे वि. अधिवक्ता यांनी प्रतिपादन केले की, मुळ अर्ज हिंदू विवाह अधिनियम कलम १३(ब) प्रमाणे घटस्फोट मिळण्याकरीता दाखल केलेला असुन अर्जदार मे २०२४ पासून विभक्त राहत आहेत.

३. अर्जदारांनी मुळ अर्ज हिंदू विवाह कायदा १९५५ चे कलम १३(ब) अन्वये संमतीने विवाह विच्छेदन होऊन मिळणेकरीता दाखल केलेला आहे. अर्जदार हे मे २०२४ पासून विभक्त राहत असल्याचे अर्जात व प्रतिज्ञापत्रात त्यांनी नमुद केलेले आहे. दिनांक ०६/०४/२०२६ रोजीचा मध्यस्थांचा अहवाल अभिलेखावर दाखल आहे. अर्जात नमुद कारण बघता व न्यायाच्या हिताच्या दृष्टीने सहा महिन्यांचा कालावधी माफ करणे न्यायोचित होईल. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**: <u>आदेश</u> :**

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. हिंदू विवाह कायदा कलम १३-ब(२) नुसार नमुद असलेला सहा महिन्यांचा कालावधी माफ करण्यात येतो.

ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR
Digitally signed by ABHIVYAKTI SUNIL BADGUJAR
Date: 2026.04.06 17:35:47 +0530

पनवेल (ए.एस. बडगुजर)
दिनांक ०६/०४/२०२६. २ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, पनवेल